  For the change of bank mandate and redemption cases subjected to cooling period wherein investor needs pay-out earlier than 10 working days, investors are requested to contact call centre on 1860 266 0111 (Charges applicable) from Monday to Saturday from 8 am to 9 pm or visit nearest NIMF branch.

This addendum forms an integral part of Statement of Additional Information (SAI) and all the other terms and conditions of the aforesaid document read with the addenda issued from time to time will remain unchanged.

For NIPPON LIFE INDIA ASSET MANAGEMENT LIMITED
(formerly known as Reliance Nippon Life Asset Management Limited)
(Asset Management Company for Nippon India Mutual Fund)
Sd/-
Authorised Signatory

Mumbai
November 27, 2020

Make even idle money work! Invest in Mutual Funds

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

नववर्षाचे स्वागत घरातूनच; सर्वांसाठी लोकलचा निर्णय तूर्त लांबणीवर

राज्यात करोना निर्बंध डिसेंबर अखेरपर्यंत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : करोना विषाणूच्या संभाव्य दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील टाळेबंदीचे निर्बंध आणखी महिनाभर वाढविण्याचा निर्णय शुक्रवारी राज्य सरकारने घेतला.

करोना निर्बंधांचा कालावधी वाढवल्यामुळे सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाच्या स्वागताला- ३१ डिसेंबरच्या रात्री होणाऱ्या जल्लोषावरही निर्बंध आले आहेत. त्यामुळे यंदा नववर्षाचे स्वागत घरातूनच करावे लागणार आहे. त्याचप्रमाणे उपनगरीय रेल्वे प्रवासाची मुभा सर्वांना देण्याचा निर्णय तूर्तास लांबणीवर टाकण्यात आला आहे. तरण तलाव, मनोरंजन उद्याने आणखी महिनाभर बंदच ठेवण्यात येणार आहेत.

हे तूर्त बंदच

- सर्वांसाठी उपनगरीय रेल्वेप्रवास. राजकीय, सामाजिक, क्रीडा, सांस्कृतिक, धार्मिक, मनोरंजनपर कार्यक्रम
- सर्वसामान्यांसाठी तरण तलाव, मनोरंजन केंद्रे
- मोकळ्या जागेतील सर्व प्रकारचे कार्यक्रम



करोनास्थिती नियंत्रणात आल्यानंतर सरकारने 'पुनःश्च सुरुवात' या अंतर्गत वेगवेगळ्या टप्प्यांवर उपाहारगृहे, बार, राज्यांतर्गत रेल्वे, मेट्रो, आठवडी बाजार, धार्मिक स्थळे, चित्रपट-नाट्यगृहे सुरू केली आहेत. दिवाळीदरम्यान लोक मोठ्या संख्येने घराबाहेर पडल्याने पुन्हा एकदा करोनाचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. यातूनच गेल्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या इयत्ता ९ ते १२वी पर्यंतच्या शाळा मुंबई, ठाणे, पुण्यात ३१ डिसेंबरपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घ्यावा लागला. गेल्या काही दिवसांपासून शहरी भागातील बाधितांची संख्या वाढू लागली असून डिसेंबरमध्ये दुसरी लाट येण्याचा इशारा आरोग्य विभागाने दिला आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून सरकारने सध्याचे निर्बंध आणखी महिनाभर म्हणजेच ३१डिसेंबरपर्यंत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

सरसकट सर्वांसाठी उपनगरीय रेल्वे सेवा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू करण्याचे नियोजन होते. परंतु मुंबई, ठाण्यातील वाढते रुग्ण लक्षात घेता बहुधा नवीन वर्षातच सर्वांना रेल्वेसेवेची मुभा मिळण्याची शक्यता आहे.

करोना बाधितांची वाढती संख्या लक्षात घेऊन राजकीय, सामाजिक, क्रीडा, सांस्कृतिक, धार्मिक, मनोरंजनात्मक कार्यक्रम, सोहळ्यावरील बंदी कायम ठेवण्यात आली आहे. उपनगरीय रेल्वे सर्वांसाठी खुली करण्याचा निर्णयही आणखी काही दिवसांसाठी लांबणीवर टाकण्यात आला असून येत्या १५ दिवसांत करोना बाधितांची संख्या पाहून पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये तसेच शैक्षणिक आणि प्रशिक्षण संस्था बंदच राहणार आहेत. इयत्ता ९वी ते १२वीचे वर्गही सुरू ठेवण्याबाबतचा निर्णय स्थानिक प्रशासनावर सोपविण्यात आला आहे. राज्यात सध्या उपाहारगृहे, चित्रपटगृहे, नाट्यगृहे, कार्यालये ५० टक्के क्षमतेने सुरू असून ती तशीच सुरू ठेवण्यात येणार आहेत.

मुंबईत करोनामुक्त होण्याचे प्रमाण ९१ टक्के

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईतील करोनाबाधितांच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे पालिका चिंतित झाली आहे. मात्र त्याच वेळी करोनामुक्त होण्याचे प्रमाण ९१ टक्क्यांवर स्थिरावले आहे. सलग तिसऱ्या दिवशी शुक्रवारी नवे रुग्ण एक हजारांपेक्षा जास्त १०७४ असून १७ रुग्णांचा मृत्यू झाला.

मुंबईतील एकूण रुग्णसंख्या दोन लाख ८० हजार ८११ वर पोहोचली आहे. मात्र मृत्यू होण्याचे प्रमाण घसरले आहे. आतापर्यंत मुंबईत १० हजार ७५६ जणांचे मृत्यू झाले आहेत. करोनामुक्तांची संख्या दोन लाख ५४ हजार ४४६ वर पोहोचली आहे. मुंबईतील विविध रुग्णालयांमध्ये १२ हजार ५८८ रुग्ण उपचार घेत आहेत. शुक्रवारी दिवसभरात तब्बल १७ हजार ९७३ चाचण्या करण्यात आल्या. रुग्ण दुप्पटीचा काळ १९५ दिवसांवर घसरला आहे.



ठाणे जिल्ह्यात ७६५ नवे रुग्ण

ठाणे जिल्ह्यात शुक्रवारी ७६५ नव्या बाधितांची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकूण रुग्णांची संख्या २ लाख २७ हजार ४१ इतकी झाली आहे. तर, दिवसभरात १२ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे. नव्या रुग्णांमध्ये कल्याण-डोंबिवली २०७, ठाणे शहरातील १८७, नवी मुंबई १४६, मीरा-भाईंदर ६२, ठाणे ग्रामीणमधील ५७, उल्हासनगर ४२, बदलापूरमधील ३२, भिवंडीतील २१ आणि अंबरनाथमधील ११ रुग्णांचा सामावेश आहे.

देशात ९३ लाख तर राज्यात १८ लाखांवर रुग्ण

गेल्या २४ तासांत देशभरात ४३०८२ लोकांना करोनाचा संसर्ग झाल्यामुळे, देशातील करोनाबाधितांची संख्या शुक्रवारी ९३ लाखांपलीकडे गेली आहे. बाधितांची एकूण संख्या शुक्रवारी ९३,०९,७८७ इतकी झाली. याचवेळी, ८७,१८,५१७ लोक संसर्गातून बरे झाले असून हे प्रमाण ९३.६४ टक्के आहे.

आतापर्यंत राज्यात १८ लाखांपेक्षा बाधित झाले असून, ४६,८९८ जणांचा मृत्यू झाला. तर गेल्या २४ तासांत राज्यात ६,१८५ नवीन रुग्णांचे निदान झाले. दिवसभरात नाशिक जिल्हा ३६१, पुणे शहर ४०६, पिंपरी-चिंचवड २२९, उर्वरित पुणे जिल्हा २६२, नागपूर शहर ३८० नवीन रुग्ण आढळले.

दप्तराचे ओझे कमी

विद्यार्थ्यांच्या वजनाच्या केवळ दहा टक्केच भार, केंद्राचे धोरण जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : अर्ध्याहून अधिक शैक्षणिक वर्ष ऑनलाइन वर्गांमुळे विद्यार्थ्यांची दप्तराच्या ओझ्यातून सुटका झाली आहे. आता पुढील शैक्षणिक वर्षातही विद्यार्थ्यांचे दप्तराचे वजन कमी करण्यासाठी केंद्राने धोरण आखले आहे. विद्यार्थ्यांच्या वजनाच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक दप्तराचे वजन असू नये असे मसुद्यात नमूद केले आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गृहपाठाचा भारही या धोरणाने मी केला आहे.



विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराच्या वजनाचा विषय सातत्याने चर्चेत असतो. वह्या, पुस्तके, डबा, पाण्याची बाटली, प्रकल्प, अभ्यासपूरक साहित्य, खेळासाठी स्वतंत्र गणवेश अशा अनेक गोष्टींनी भरलेले दप्तर विद्यार्थ्यांच्या पाठीवर लादले गेले आहे. दप्तराचे वजन कमी करण्याबाबत न्यायालयातही याचिका दाखल आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रशासनाने धोरण तयार करण्यासाठी २०१८ मध्ये तज्ज्ञांची समिती नेमली होती. या समितीने दिलेला अहवाल केंद्रीय शिक्षण विभागाने मंजूर केला आहे. या धोरणाप्रमाणे अंमलजबावणी करण्याचे आदेश राज्यांना दिले आहेत.

कोणत्या इयत्तेसाठी किती वजनाचे दप्तर

इयत्ता	विद्यार्थ्याचे वजन	दप्तराचे वजन
पूर्वप्राथमिक	१० ते १६	दप्तर नको
पहिली , दुसरी	१६ ते २२	१.६ ते २.२
तिसरी ते पाचवी	१७ ते २५	१.७ ते २.५
सहावी, सातवी	२० ते ३०	२ ते ३
आठवी	२५ ते ४०	२ ते ५.४
नववी, दहावी	२५ ते ४५	२.५ ते ४.५
अकरावी, बारावी	३५ ते ५०	३ ते ५.५

विद्यार्थ्यांचे आणि दप्तराचे वजन किलोग्रॅममध्ये आहे.

चाके असलेली दप्तरे नको

अनेकदा विद्यार्थ्यांच्या दप्तराचे मूळ वजनच अधिक असते. त्यात साहित्य भरल्यावर ते अधिकच वाढत जाते. त्यामुळे कमी वजनाचे कापड किंवा साहित्य वापरून तयार केलेली दप्तरेच विद्यार्थ्यांना द्यावीत. दोन्ही खांद्यावर लावता येतील अशी आणि मऊ पट्टे असेलली दप्तरे असावीत. त्याचप्रमाणे पाठीवर दप्तराचे वजन नको म्हणून चाके असलेली दप्तरे वापरण्याकडे पालक आणि विद्यार्थ्यांचा अधिक कल आहे. मात्र ही चाके असलेल्या दप्तरांचे वजन अधिक असते. त्यामुळे अशी दप्तरे वापरण्यात येऊ नयेत, अशी सूचना देण्यता आली आहे.

गृहपाठही घटणार

दुसरी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरदिवशी दोन तास आणि त्यापुढील विद्यार्थ्यांना दरदिवशी दोन ते पाच तासांपर्यंत गृहपाठ शाळा देतात असे विद्यार्थी आणि पालकांच्या सर्वेक्षणातून समोर आले. त्या अनुषंगाने कोणत्या इयत्तेसाठी किती गृहपाठ द्यावा याचेही कोष्टक केंद्राच्या धोरणात देण्यात आले आहे. त्यानुसार पूर्वप्राथमिक ते दुसरीच्या विद्यार्थ्यांना गृहपाठ देण्यात येऊ नये. तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्याला २ तासांपर्यंत, सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ५ ते ६ तास आठवड्याला आणि नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना आठवड्याला १० ते १२ तासांचा गृहपाठ असावा.

धोरण मसुदा काय?

- पूर्वप्राथमिक वर्गांची शाळा शक्यतो दप्तराविना असावी.
- पहिली आणि दुसरीसाठी एक वही तर तिसरी ते पाचवीसाठी एक वर्गातील अभ्यासाची आणि एक गृहपाठाची अशा दोन वह्या असाव्यात.
- सहावीपासून पुढील वर्गातील विद्यार्थ्यांना सुट्टे कागद आणण्याची परवानगी द्यावी.
- कागद संकलित करून ते टाचून (फायलिंग) कसे ठेवावे हे विद्यार्थ्यांना शिकवण्यात यावे. शाळांनी माध्यान्ह भोजन आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी.
- अधिक वह्या, पुस्तके आणावी लागणार नाहीत असे वेळापत्रक असावे.
- पाठ्यपुस्तके एकत्रित वापरण्याची किंवा एकमेकांत देवाणघेवाण करण्याची मुभा विद्यार्थ्यांना द्यावी. त्याचबरोबर प्रत्येक पाठ्यपुस्तकावर त्याचे वजनही छापण्यात यावे. ते वजन लक्षात घेऊन शाळांनी वेळापत्रक निश्चित करावे.
- शिक्षकांनी वारंवार विद्यार्थ्यांचे दप्तर तपासावे.


> राज्याने यापूर्वीच धोरण अंमलात आणले आहे. त्यातील अनेक बाबी केंद्राने स्वीकारल्या आहेत. पालक आणि शिक्षकांनी जागरूकपणे अंमलबजावणी केली पाहिजे.
>
> – दिनकर टेमकर, केंद्रीय समितीचे सदस्य आणि सहसंचालक, प्राथमिक शिक्षण

चाचण्या वाढूनही बाधितांची संख्या कमी

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : दिवाळीनंतर करोना रुग्ण वाढण्याची शक्यता असल्यामुळे मुंबई महापालिकेने चाचण्यांची संख्या वाढवली. मात्र चाचण्यांची संख्या वाढवूनही तुलनेने बाधितांचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. तसेच मुंबईत सध्या ११,६९७ रुग्ण उपचाराधीन असून त्यापैकी ८,०७२ रुग्णांना कोणतीही लक्षणे नाहीत. तर लक्षणे असलेल्या २,८८४ रुग्णांपैकी केवळ ७४१ रुग्ण गंभीर आहेत.

दिवाळीनंतर पालिकेने प्रति दिन १४ ते १५ हजारांवर असलेली चाचण्यांची संख्या वाढवून १८ ते १९ हजारांपर्यंत नेली आहे. बुधवारपासून परराज्यातून आलेल्या प्रवाशांच्या चाचण्या रेल्वे स्थानकावर केल्या जात आहेत.



बुधवारी १९ हजार चाचण्या करण्यात आल्या. आठ महिन्यांतील एका दिवसातील ही चाचण्यांची सर्वाधिक संख्या आहे. चाचण्यांच्या तुलनेत बाधित रुग्णांचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. आतापर्यंत १८ लाख ३६ हजार चाचण्या करण्यात आल्या आहेत. सध्या १३,९२२ एकूण खाटांपैकी ८८४० खाटा रिक्त आहेत. अतिदक्षता विभागाच्या १९२६ खाटांपैकी ७८६ खाटा रिक्त आहेत. अतिसंक्रमित क्षेत्र असलेल्या वरळी, प्रभादेवीत या आठवड्यात एकही प्रतिबंधित क्षेत्र नाही.

मृत्युदरातही घट

दिवाळीनंतर करोनाबाधितांच्या संख्येत पुन्हा वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. असे असले तरी आठवड्याचा मृत्युदर अडीच टक्क्यांवरून दोन टक्क्यांपर्यंत खाली आला आहे.

दिवाळीमुळे लोकांचा बाजारपेठेतील वावर वाढला होता. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था खुल्या झाल्याने शहरात बाहेरून येणाऱ्यांची ये-जा देखील वाढली. परिणामी शहरातील दरदिवशीच्या रुग्णांची संख्या पाचशेवरून पुन्हा एकदा हजाराच्या घरात पोहोचली आहे. बुधवारी आणि गुरुवारी अनुक्रमे शहरात १११४ आणि ११४७ नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. शहरात सध्या सर्वाधिक रुग्ण हे बोरिवली (आर मध्य), कांदिवली (आर दक्षिण), भांडुप (एस), मुलुंड(टी), ग्रॅण्टरोड (डी), अंधेरी (के पश्चिम) या विभागात आहेत. ऑक्टोबरमध्ये दर आठवड्याच मृत्युदर हा जवळपास तीन ते चार टक्क्यांदरम्यान होता. नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात तर दोन टक्क्यापर्यंत (१.९७ टक्के) खाली घसरला आहे.

प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर

मुंबई : विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या परीक्षांपैकी १० परीक्षांचे निकाल प्रवेश नियमन कक्षाने शुक्रवारी जाहीर केले. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रियाही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे कक्षाने स्पष्ट केले आहे.

सामाईक परीक्षा कक्षाने ऑक्टोबर आणि नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या. मराठा आरक्षण वगळून प्रवेश देण्याचा निर्णय शासनाने जाहीर केल्यानंतर आता प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर करणे आणि प्रवेश प्रक्रियेने वेग घेतला आहे. उच्च शिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या आठ परीक्षांपैकी सहा परीक्षांचे निकाल कक्षाने जाहीर केले. वास्तूकला पदव्युत्तर, हॉटेल मॅनेजमेंट पदवी आणि पदव्युत्तर, शिक्षणशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर, शारीरिक शिक्षणशास्त्र, पाच वर्षांचा विधि अभ्यासक्र म, एमसीए या अभ्यासक्र माच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले.



मध्य रेल्वे

झाडांच्या फांद्यांची ट्रिमिंग व कटिंग

अनु क्र. : १. **कामाचे नाव** : दोन वर्षांकरिता लोणावळा जिल्ह्याच्या कर्जत-खोपोली व कर्जत-पनवेल अनुभाग, कल्याण-लोणावळा (घाट अनुभाग समाविष्ट) आणि कल्याण जिल्ह्याच्या डीडब्ल्यू-कल्याण, कल्याण-इगतपुरी (घाट अनुभाग समाविष्ट) मधील रनिंग ट्रॅकच्या ओएचईकडील सुरक्षिततेतील अडथळा दूर करून झाडांच्या फांद्यांची ट्रिमिंग व कटिंग. **अदमासे मूल्य** : रु. ४८९७२५५. **इरठे** : रु. ९८०००. **निविदा प्रपत्रांची किंमत** काही नाही. **पूर्तता कालावधी** : २४ महिने पावसाळा समाविष्ट. निविदेच्या सादरीकरणाची तारीख व वेळ १८.१२.२०२० रोजी स. ११.०० वा.पर्यंत असेल. ई-निविदेचा संपूर्ण तपशील http://www.ireps.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संपूर्ण कागदपत्रे संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. निविदेचा तपशील सीनि. डीईई (टीडी) केवायएन यांचे कार्यालय, कल्याण येथील "सूचना फलका"वर उपलब्ध आहे.

खुली ई-निविदा सूचना क्र. : केवायएन.एलडी.५८३.पी.रिव्हा. २०२०-२१/०६.कॉन्ट.

अखिल भारतीय प्रवासी मदतवाहिनी १३९ 553

पश्चिम रेल्वे-रतलाम विभाग

ई-निविदा सूचना

उप मुख्य अभियंता (बांधकाम), IV, पश्चिम रेल्वे, इंदोर (एमपी), हे खाली देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार ई-निविदाकरणाद्वारे निविदा मागवीत आहेतः **निविदा क्र.** इंड-यूजेएन/डीएल/१५आर-१; **कामाचे नाव**: पश्चिम रेल्वेच्या उज्जैन-इंदोर दुपरीकरण प्रकल्पाच्या संदर्भात लक्ष्मीबाईनगर (सह) ते देवास (वगळता) दरम्यान अनुभाग/ यार्डमध्ये मेन आणि लूप लाइन्ससाठी बीजीचे टाकणे आणि जोडणे, पी. वे साहित्याची वाहतूक, रेल रिन्युअलद्वारे सध्याच्या बीजी ट्रॅकचे पाडकाम. **अंदाजे मूल्य**: रु. १५६७५०३१७.४७; **इरठे**: रु.९३३८००.००; **निविदेच्या सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ**: ३०.१२.२०२० रोजी १५.०० वा.पर्यंत; **उघडण्याचा दिनांक आणि वेळ**: ३०.१२.२०२० रोजी १५.३० वा.; पात्रता निकषांच्या सहनिविदेचा पूर्ण तपशील www.ireps.gov.in या संकेतस्थळावर आणि उप मुख्य अभियंता (बांधकाम) IV, पश्चिम रेल्वे, इंदोर फलाट क्र. १ च्यासमोर, इंदोर, यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावरदेखील उपलब्ध आहे. क्र. इंड/डब्ल्यू-६२३/१ दिनांकित २४.११.२०२०.

उप मुख्य अभियंता (सी)IV, पश्चिम रेल्वे, इंदोर (एमपी)

AK/5/1/247

आम्हाला लाइक करा facebook.com/WesternRly

NSE

National Stock Exchange of India Ltd.

'Exchange Plaza', Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai-400 051

NOTICE

Notice is hereby given that the following Trading Member of the National Stock Exchange of India Limited (Exchange) has been declared defaulter under Byelaw 1(a) of Chapter XII of the Byelaws of the Exchange and expelled under Rules 1 and 2 of Chapter IV of the Rules of the Exchange:

Sr. No.	Member Name	SEBI Regn No.	Date of declaration of defaulter	Date of expulsion
1.	Anugrah Stock & Broking Pvt. Ltd.	INZ000200231	Nov. 26, 2020	Nov. 26, 2020

The constituents of the above mentioned member are hereby advised to lodge claims, if any, in the prescribed claim form, against the above mentioned member within 3 months from the date of this notice.

All claims submitted by investors will be considered for processing if found due and payable in accordance with Rules, Byelaws, Regulations, guidelines etc. of the Exchange, SEBI circulars and Regulations and the maximum compensation limit per investor is ₹25 lakhs out of the Investor Protection Fund.

The claim can be lodged online on the Exchange portal **https://investorhelpline.nseindia.com/NICEPLUS/welcomeUser** where the relevant documents can be uploaded. A sample claim form and FAQ is made available on the Exchange website **https://www.nseindia.com/invest/details-to-be-provided-for-lodging-claims** for the convenience of the claimants.

Alternatively, the claim form, duly filled and signed, along with the relevant documents may also be sent in physical form to the Defaulters' Section of the Exchange at 'Exchange Plaza', Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai 400 051 or at the regional / branch offices of the Exchange. For this purpose, the format of the claim form may be downloaded from **https://www.nseindia.com** or obtained from the corporate office at Mumbai or the regional / branch offices of the Exchange. However, the Exchange urges all claimants to make use of the online claim lodgment facility as mentioned above for better tracking of your claims.

In case of any queries you may contact us on **defaultisc@nse.co.in** or on toll free number 1800 266 0058 (Option - 2).

For **National Stock Exchange of India Ltd.**
Sd/-
Chief Manager
Defaulters' Section

Place: Mumbai
Date: November 28, 2020

Nifty50

PUBLIC NOTICE

तमाम जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की **श्री. समीर नरेन भोजवानी ("मालक")** ज्यांचे कार्यालय समीर कॉम्प्लेक्स, १ला मजला, सेंट अँड्र्यूज रोड, होली फॅमिली हॉस्पिटल समोर, बांद्रा (प), मुंबई - ४०० ०५० येथे आहे ते आमच्या आशिला सोबत येथे खाली लिहीलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या (**"प्रिमायसेस"**) प्रिमायसेसच्या विक्रीकरिता बोलणी करत आहोत.

मालकाने आमच्या आशिलांना कळवले आहे की त्याने एचडीऐफसी बँक लिमिटेडच्या नावे प्रिमायसेस संबंधी ताबा तयार केला आहे (जो ताबा मालक हटवण्यास तयार आहेत).

विक्री, हस्तांतरण, बेचनपत्र, देवाण घेवाण, हक्क, हित, स्वारस्य, भाग, लाभ, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडे करार, उप भाडेकरार, परवाना, कर्ज फिटेपर्यंत मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा हक्क, गहाण, ताबा, अडथळा, कब्जा, केअर-टेकर तत्वावर, मृत्यूपत्राने मिळकत, विश्वस्त संस्था, वहिवाटीचा हक्क, भेट, वारसा, मृत्यूपत्राद्वारा प्राप्त होणारे, प्रतिपाळ, अधिकार, विकास हक्क, राईट ऑफ वे, आरक्षण, कौटुंबिक तजवीज/ सेटलमेंट, करारनामा, लिस्पेन्डन्सेस, हुकुमनामा किंवा कोणत्याही न्यायालयाचा आदेश, भागीदारी किंवा अन्यथा ज्या कोणत्याही स्वरुपातील प्रिमायसेस साठी किंवा त्यासंबंधी कोणताही दावा, आक्षेप, मागणी, योग्य भाग, हित आणि / अथवा फायदा असलेल्या सर्व व्यक्तिंचे / संस्था आणि / अथवा कोणत्याही बँक आणि / अथवा वित्तीय संस्था आणि / अथवा ऑथॉरिटी यांनी याद्वारे कृपया लेखी स्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे **ईमेलच्या स्वरुपाद्वारा minal.sampat@dvassociates.co.in** आणि **objections@dvassociates.co.in** द्वारा ते याच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांत सूचित करावे, अन्यथा, सदर व्यक्ति किंवा व्यक्तिंचे जे कोणतेही दावा किंवा दावे, असतील तर ते माफ, सोडून देण्यात, आणि / अथवा त्याग केला आहे असे समजण्यात येईल.

येथे उपरोक्त संदर्भित परिशिष्ट
(सदर प्रिमायसेसचे वर्णन)

निवासी डयुप्लेक्स अपार्टमेंट युनिट क्र. २ चे क्र. ९२ आणि १०२ च्या क्षेत्रफळ सुमारे २७६ चौरस मीटर्स बांधीव क्षेत्र त्याइकेच २७२३ चौरस फूट किंवा सुमारे तेवढेच असलेले चटई क्षेत्र (अंतर्गत जीना - २ समाविष्ट) (**"अपार्टमेंट"**) च्या ७व्या आणि ८व्या मजल्यावर सदर अर्पामेंट लगतचे इतर क्षेत्र आणि ७व्या आणि ८व्या मजल्यावरील नरेन टेरेसेस (**"इमारत"**) म्हणून ज्ञात इमारतीच्या ४ (चार) कार पार्किंग जागा वापरण्यासाठी संपूर्ण हक्क प्रत्येकी क्षेत्रफळ १० चौरस मीटर्स (बांधीव क्षेत्र) असलेल्या क्र. ५२, ५३, ५४ आणि ५५ इमारतीच्या खालील स्टील्ट मजल्यावरील, सामान्य भागात आणि त्या इमारतीच्या सुविधामध्ये ५.१३% अविभाजनीय भाग, हक्क, हित आणि स्वारस्य यासोबत सदर जमिनीत (खाली परिभाषित केल्याप्रमाणे) आणि सदर इमारातीच्या सदर अपार्टमेंट संबंधी मतदान हक्कांतील ५.१३% प्रमाणात दर्शवले बृहन्मुंबईतील पाली हिल, बांद्रा येथे स्थित मूळ भूखंड क्र. ८ असलेल्या खटाव पाली हिल खाजगी योजनेचा सर्व्हे क्र. ३१८ (भाग) दांडाचा आणि आता सीटीएस क्र. सी १६२९ए १/५ असणाऱ्या बांद्राच्या आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर हिल्हा आणि उप जिल्हा येथे क्षेत्रफळ सुमारे १६३३.२० चौरस मीटर्स युनियन पार्क, बांद्रा (प), मुंबई - ४०० ०५० (**"सदर जमीन"**) सर्व तुकडे आणि हिश्यांवर उभ्या आणि चतुः सीमा खालील प्रमाणे:

उत्तरेस किंवा उत्तरेकडेः	१३.४१ मीटर्स रुंद पाली हिल रोड;
दक्षिणेस किंवा दक्षिणेकडेः	सीटीएस क्र. सी १६२९; ५.४८ मीटर रुंद असलेला खाजगी रस्ता;
पूर्वेस किंवा पूर्वेकडेः	सीटीएस क्र. सी/ १६२९ए १/६ आणि
पश्चिमेस किंवा पश्चिमेकडेः	सीटीएस क्र. सी/ १६२९ए १/४.

२८ नोव्हेंबर, २०२० रोजी दिनांकित.

मीनल संपत
भागीदार
धवल वसनजी ॲण्ड असोसिएट्स
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स

ता. क.: आक्षेप, जर कोणतेही असतील, तर कोविड - १९ च्या देशभरातील उद्रेकामुळे केवळ ईमेल वर पाठवणे अनिवार्य आहे.

Camlin KOKUYO

कोकुयो कॅम्लिन लिमिटेड

CIN: L24223MH1946PLC005434
नोंदणीकृत कार्यालय: हिल्टन हाऊस, ४८/२, सेन्ट्रल रोड, एम.आय.डी.सी., अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.
टेलि: ९१-२२-६६५५ ७०००, फॅक्स: ९१-२२-२८३६ ६५७९
वेब: www.kokuyocamlin.com ई-मेल: investorrelations@kokuyocamlin.com

पोस्टल बॅलट नोटीस व ई-व्होटिंग माहिती

याद्वारा सूचना देण्यात येते की, बुधवार, २८ ऑक्टोबर २०२० रोजी घेण्यात आलेल्या कंपनीच्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांच्याद्वारा मान्य केल्यानुसार ०१ नोव्हेंबर, २०२० पासून ते ३१ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत प्रभावापासून तीन (३) वर्षांच्या कालावधीकरिता ''कार्यकारी संचालक'' म्हणून पदनिर्देशित पूर्ण-वेळ रोजगारातील संचालक म्हणून श्री. नोबूचिका डोई (डीआयएनः ०३५९९८३५) यांच्या नेमणुकीकरिता विशेष ठरावामार्फत पोस्टल बॅलटद्वारा कंपनी तिच्या सदस्यांकडून मान्यता मिळवीत आहे.

पोस्टल बॅलट नोटीस **https://www.kokuyocamlin.com** या कंपनीच्या वेबसाइटवर, **https://www.evoting.nsdl.com** या नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या (''एनएसडीएल'') वेबसाइटवर आणि स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइटवर जेथे कंपनीचे समन्याय भाग सूचिबद्ध आहेत म्हणजेच बीएसई लिमिटेड (''बीएसई'') (**www.bseindia.com**) व नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या (''एनएसई'') (**www.nseindia.com**) वेबसाइट्सवर उपलब्ध आहे.

निगम कामकाज मंत्रालयाद्वारा निर्गमित केलेल्या दिनांकित ८ एप्रिल, २०२० परिपत्रक क्र. १४/२०२०, दिनांकित १३ एप्रिल, २०२० परिपत्रक क्र. १७/२०२० व दिनांकित २८ सप्टेंबर, २०२० परिपत्रक क्र. ३३/२०२० च्या अनुपालनार्थ कंपनीने सदस्यांना, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी डिपॉझिटरीकडे नोंदणीकृत आहेत आणि ज्यांचे नावे २० नोव्हेंबर, २०२० (''कट-ऑफ तारीख'') रोजीप्रमाणे डिपॉझिटरीजद्वारा ठेवण्यात आलेल्या लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत किंवा कंपनीच्या सदस्यांच्या नोंदवहीत अभिलिखित आहेत, केवळ इलेक्ट्रॉनिक प्रणालीत २७ नोव्हेंबर, २०२० रोजी पोस्टल बॅलट नोटीस पाठविण्यात आली आहे.

कंपनीने तिच्या सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग सुविधेची तरतूद करण्याकरिता एनएसडीएलची सेवा नियुक्त केली आहे. रिमोट ई-व्होटिंग कालावधी रविवार, २९ नोव्हेंबर, २०२० रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि सोमवार, २८ डिसेंबर, २०२० रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) संपेल. ई-व्होटिंग प्रणाली त्यानंतर एनएसडीएलद्वारा निःसमर्थ करण्यात येईल, सदस्यांच्या मतदानाचा हक्क कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समन्याय भाग भांडवलाच्या प्रमाणशीर असेल व ते रिमोट ई-व्होटिंगद्वारा त्यांचे मतदान करण्यास हक्कदार असतील. सदस्याद्वारा ठरावावर एकदा मतदान केल्यास, तद्‌नंतर त्याला / तिला ते बदलण्यास अनुमती दिली जाणार नाही.

भागधारक ज्यांचे ईमेल आयडी'ज युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्याकरिता नोंदणीकृत केलेले नाहीत याकरिता प्रक्रिया आणि या सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावावर ई-व्होटिंगकरिता ई-मेल आयडी'जची नोंदणी

प्रत्यक्ष स्वरूपात असलेल्या भागांबाबत कृपया **investorrelations@kokuyocamlin.com** यावरून ई-मेलद्वारा फोलिओ नं., भागधारकाचे नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील व मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), आधार (आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत) इ.ची तरतूद करावी.

डिमॅट स्वरूपात असलेल्या भागांबाबत, कृपया **investorrelations@kokuyocamlin.com** यावरून ईमेलद्वारा डीपीआयडी-सीएलआयडी (१६ डिजिट डीपीआयडी + सीएलआयडी किंवा १६ डिजिट बेनिफिशियरी आयडी), नाव, क्लाइंट मास्टर किंवा एकत्रीकृत खाते विवरणाची प्रत, पॅन (पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), आधार (आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), इ.ची तरतूद करावी.

असे स्पष्ट करण्यात येते की, ईमेल पत्त्याच्या कायमस्वरूपी नोंदणीकरिता, सदस्यांना तथापि विनंती करण्यात येते की, त्यांनी इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील भागांच्या बाबतीत त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सद्वारा डिपॉझिटरीकडे आणि प्रत्यक्ष स्वरूपातील भागांच्या बाबतीत कार्यपद्धतीचे अनुपालन करून कंपनीचे रजिस्ट्रार ॲण्ड शेअर ट्रान्सफर एजन्ट, मेसर्स लिंक इन्टाइम प्रायव्हेट लिमिटेड (युनिटः कोकुयो कॅम्लिन लिमिटेड), ईमेलः **rnt.helpdesk@linkintime.co.in** टेलि. नं. ९१-०२२-४९१८६२७० यांच्याशी संपर्क साधावा.

ई-व्होटिंगसंबंधित तपशिलाकरिता, कृपया पोस्टल बॅलट नोटीस पाहावी. कोणतीही शंका असल्यास, तुम्ही **https://www.evoting.nsdl.com** यावरील डाऊनलोड सेक्शनवर भागधारकांकरिता उपलब्ध असलेले ई-व्होटिंग युजर मॅन्युअल आणि भागधारकांकरिता असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन (एफएक्यू'ज) पाहू शकाल किंवा **evoting.nsdl.co.in** यावर विनंती पाठवू शकाल. जर इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारा मतदानाकरिता सुविधेसंबंधित कोणतीही तक्रार असल्यास, कृपया संपर्क साधाः श्रीमती सरिता मोटे, साहाय्यक व्यवस्थापक, एनएसडीएल, ईमेलः **evoting@nsdl.co.in/saritaM@nsdl.co.in**, टेलि.: ९१-२२-२४९९४८९० / १८००-२२२-९९०.

कंपनीच्या संचालक मंडळाने ई-व्होटिंग प्रक्रियेचे आयोजन स्वच्छ व पारदर्शक पद्धतीने होण्याकरिता परिनिरीक्षक म्हणून श्री. जे. एच. रानडे, भागीदार यांच्या अनुपस्थितीत श्री. सोहन जे. रानडे, भागीदार यांच्या अनुपस्थितीत श्रीमती तेजस्वी झोपे, मेसर्स जेएचआर ॲण्ड असोसिएट्सचे भागीदार यांची नेमणूक केली आहे.

पोस्टल बॅलटचा निकाल ३० डिसेंबर, २०२० रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) किंवा तत्पूर्वी घोषित करण्यात येणार आहे. परिनिरीक्षकाच्या अहवालासमवेत उक्त निकाल बीएसई व एनएसईकडे कळविण्यात येईल आणि **https://www.kokuyocamlin.com** या कंपनीच्या वेबसाइटवर तसेच **www.evoting.nsdl.com** या एनएसडीएलच्या वेबसाइटवरसुद्धा अपलोड करण्यात येणार आहे.

कोकुयो कॅम्लिन लिमिटेड करिता
रवींद्र व्ही. दामले
उपाध्यक्ष (कार्पोरेट) व कंपनी सचिव

स्थळः मुंबई
तारीखः २८ नोव्हेंबर, २०२०

(मूळ इंग्रजी मसुद्याचे हे भाषांतर असून सर्व विवादामध्ये मूळ इंग्रजी मुसदा प्रमाण मानण्यात येईल.)